**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१५१२/२०२५**
**निशाणी क्रमांकः– ११ खाली**
**स्मिता पाटील व इ. वि. कोणीही नाही.**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,
माझे नावः– स्मिता हिरामन पाटील

**सरतपास अर्जदार तर्फे वकील श्रीमती मानसी नांदगावकर यांचे मार्फत सुरू**

०१. सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे व तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली. मी माझ्या पतीच्या मृत्युचे मुळ प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यास **नि.१२** देण्यात येत आहे. मी माझ्या मुलाच्या मृत्यूच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत मी दाखल केली आहे व मुळ प्रत सोबत आणले आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१३** देण्यात येत आहे. माझ्या व माझ्या पतीच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या नोदणीकृत करारनामा क्र.१४४५/२००७ ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१४** देण्यात येत आहे.सदर मालमत्तेचे शेअर सर्टीफिकेटची झेरॉक्स दाखल केले आहे व मुळ सर्टीफिकेट सोबत आणले आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१५** देण्यात येत आहे. माझ्या पतीच्या नावावर असलेल्या माऊली अर्पाटमेंट या मालमत्तेच्या नोदणीकृत करारनामा ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१६** देण्यात येत आहे.सदर मालमत्तेचे शेअर सर्टीफिकेटची झेरॉक्स दाखल केले आहे व मुळ सर्टीफिकेट सोबत आणले आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१७** देण्यात येत आहे.

०२. दैनिक किल्ले रायगड या पेपरमध्ये दि.११/१२/२०२५ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केलेला आहे. त्यास **आर्टिकल अ**

देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-

**ठिकाणः पनवेल**
**दिनांकः– २१/०२/२०२६.**

**(आर. वाय.खंडारे)**
**५वे सह दिवाणी न्यायाधीश,**
**व. स्तर, पनवेल**